# ऋणनिर्देश

भारत हा विकसाशील देश आहे. देश विकसित करण्यासाठी अनेक घटकाचा विकास करावा लागतो. त्यातील एक महत्वाचा घटक कुटुंब आहे. कुटुंबास एक सामाजिक समूह, एक सामाजिक घटक, एक मंडळ, संघटन आणि एक सामाजिक व्यवस्था सुध्दा मानले जाते. कुटुंबास खुप महत्व आहे. कारण व्यक्ति तसेच संपूर्ण समाज याच्यांसाठी महत्वाची कार्य पार पाडते. त्यामुळे कुटुंबाला केंद्रस्थान प्राप्त झाले आहे. हे सामाजिक संरचनेचा कणा आहे. कुटुंबातील गृहिणी कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता गृहिणी सतत कार्य करीत असते. ते फक्त आपल्या कुटुंबातील व्यक्तिच्या समाधानासाठी आपले कर्तव्य म्हणून पार पाडीत असते. समाजातील व्यक्तिला घडविण्याचे कार्य कुटुंबातूनच केले जातात. कुटुंबातील योग्य व्यवस्थापानामुळे सदस्यांचा विकास होत असतो. म्हणूनच **“ व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून नांदेड जिल्ह्यातील महिलांचा गृहिणीकडून गृहव्यवस्थापकाकडे त्या बदलाच्या भूमिकेचा व्यष्टि अभ्यास, ”** हा विषय मी प्रस्तुत पीएच.डी. च्या शोधनिबंधासाठी निवडला व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठाने माझ्या या विषयाला मान्यता देवून मला प्रेरणा दिली. त्यामुळे मला प्रस्तुत शोधनिबंधामुळे मला महिलांच्या गृहकार्याविषयीचे विचार मांडण्याची संधी मिळाली. त्याबद्दल मी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. पंडीत विद्यासागर यांचे व विद्यापीठाचे ऋणी आहे. हे संशोधन करीत असताना अनेक मान्यवरांचे व माझे हितचिंतक यांचे सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. त्यांची कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.

माझ्या प्रबंधानाचे मार्गदर्शक दत्त महाविद्यालय, हदगांव, जि. नांदेडचे डॉ.एस.बी. अडकिणे अध्यापन कार्यात व्यस्त असताना देखील त्यांनी माझ्या संशोधन कार्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी राहील.